# डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.

## जवाहर कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, अणदूर

ता. तुळजापूर जि. उस्मानाबाद 413603

## राष्ट्रीय सेवा योजना

वार्षिक विशेष शिबीर सन 2021- 22

## अहवाल

जवाहर कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, अणदूर राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे वार्षिक विशेष शिबीर मौजे वस्तलानगर पोस्ट अणदूर ता. तुळजापूर जि. उस्मानाबाद येथे दि. 19/03/2022 ते 25/3/2022 दरम्यान पार पडले. शिबीरात विद्यापीठाच्या 100 विद्यार्थ्यांच्या मंजुरी नुसार 50 मुले, 50 मुली, 4 प्राध्यापक व 1 शिपाई इत्यादी सहभागी होते. शिबीराचा विषय " स्वच्छग्राम व आरोग्य संवर्धनासाठी युवा " असा होता. शिबीरात खालील प्रमाणे कार्यक्रम घेण्यात आले.

**पहिला दिवस :** शनिवार दि. 19/03/2022 रोजी दुपारी ठीक 12 वाजता मौजे वत्सलानगर पोस्ट अणदूर ता. तुळजापूर येथे जिल्हा परिषद प्राथमिक शाळेवर सर्व विद्यार्थी, 4 प्राध्यापक व 1 शिपाई यांचे आगमन झाले. शिबीराच्या उद्घाटन स्थळी स्वच्छता केली. शिबीरार्थी जेथे मुक्कामी राहणार होते, तेथे स्वच्छता करण्यात आली.







स्वयंपाक रूम मध्ये स्वच्छता करून स्वयंपाक करण्यास सुरुवात केली. शिबीरस्थळी स्टेज व






मंडप टाकून उद्घाटन कार्यक्रमाची तयारी केली. सायंकाळी ठीक 6 वाजता शिबीराचे उद्घाटन करण्यात आले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला महात्मा गांधी व कै. सि. ना. आलुरे गुरुजी यांच्या प्रतिमेचे पूजन केले. नंतर दीपप्रज्वलित



करून शिबीराचे उद्घाटन जिल्हा परिषदेचे सदस्य मा. श्री बाबुराव चव्हाण यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून अणदूर गावचे सरपंच मा. श्री रामचंद्र(दादा)



आलुरे हे होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. अनिता मूदकण्णा यांनी केले. प्राचार्य डॉ. उमाकांत चनशेट्टी यांच्या स्वागतपर भाषणानंतर उद्घाटक मा. श्री बाबुराव चव्हाण यांचे मार्गदर्शन झाले.

अध्यक्षीय समारोप करताना मा. श्री रामचंद्र



(दादा) आलुरे यांनी शिबीरासाठी सर्व प्रकारची मदत करण्याचे आश्वासन दिले.. शेवटी कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. सूर्यकांत आगलावे यांनी केले. कार्यक्रमाला अणदूरच्या ग्रामपंचायतचे उपसरपंच मा. डॉ. नागनाथ कुंभार, सदस्य मा. डॉ. जितेंद्र कानडे, डॉ. विवेक बिराजदार, श्री बाळकृष्ण घोडके, श्री बालाजी घुगे, श्री महादेव जाधव, श्री दिनकर कुलकर्णी, सौ चव्हाण मॅडम, श्री दयानंद काळुंके, मुख्याध्यापक श्री जाधव सर, प्राचार्य, प्राध्यापक, विद्यार्थी व वत्सलानगर चे ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. वंदे मातरम गीतानंतर कार्यक्रमाची सांगता झाली.

**अणदूर, दि. १९ मार्च -**

तुळजापूर तालुक्यातील अणदूर येथील जवाहर कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय राष्ट्रीय सेवा योजना व डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद यांच्या संयुक्त विद्यमाने दि. १९ ते २५ या कालावधीत 'स्वच्छ ग्राम व आरोग्य संवर्धनासाठी युवा' या वार्षिक शिबिराचे उद्घाटन आज दि. १९ रोजी वत्सलानगर जि. प. प्राथमिक शाळा येथे करण्यात आले. अध्यक्षस्थानी सरपंच रामचंद्र आलुरे हे होते तर उद्घाटक म्हणून जि.प.सदस्य बाबुराव चव्हाण हे होते. प्राचार्य उम ाकांत चन्नशेट्टी, दिनकरराव कुलकर्णी, चेरमन सिद्रामप्पा शेटे, उपसरपंच डॉ. नागनाथ कुंभार, डॉ. विवेक बिराजदार, डॉ. जितेंद्र कानडे, बालाजी घुगे, बाळकृष्ण घोडके आदींची प्रमुख उपस्थिती होती. या शिबिरात ग्रामस्वच्छता, वृक्षारोपण, सांडपाणी व घनकचरा व्यवस्थापन, राष्ट्रीय एकात्मता, पर्यावरण संवर्धन, श्रमदान, आरोग्य शिबीर,आदी प्रकल्प राबविण्यात येणार आहेत. प्रास्ताविक प्रा.डॉ. अनिता मुदकण्णा यांनी केले तर आभार प्रा.डॉ. सुर्यकांत आगलावे यांनी मानले.

## 'जवाहर'च्या रासेयो शिबिरास प्रारंभ

लोकमत न्यूज नेटवर्क

**अणदूर :** येथील जवाहर महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभाग आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने येथील वत्सलानगर येथे स्वच्छ ग्राम व आरोग्य संवर्धनासाठी युवकांचा सहभाग या शिबिरास नुकताच प्रारंभ झाला.

अध्यक्षस्थानी सरपंच रामचंद्र आलुरे तर उद्घाटक म्हणून जि.प. सदस्य बाबूराव चव्हाण उपस्थित होते. प्राचार्य डॉ. उमाकांत चनशेट्टी, उपसरपंच डॉ. नागनाथ कुंभार, सोसायटीचे चेअरमन सिद्राम शेटे, डॉ. जितेंद्र कानडे, बाळकृष्ण घोडके पाटील, डॉ. विवेक बिराजदार, बालाजी घुगे, दिनकरराव कुलकर्णी, संतोष व्हटकर, सत्यशीला चव्हाण, बी. के. कांबळे यांची प्रमुख उपस्थिती होती. शिबिरात ग्रामस्वच्छता, वृक्षारोपण, सांडपाणी व घनकचरा व्यवस्थापन, राष्ट्रीय एकात्मता, पर्यावरण संवर्धन, अंधश्रद्धा निर्मूलन, आरोग्य शिबिर, शेतकरी मेळावा, महिला मेळावा, व्यसनमुक्ती, विविध कला गुणदर्शन आदी कार्यक्रम होणार आहेत. प्रास्ताविक माजी प्राचार्या डॉ. अनिता मुदकन्ना, सूत्रसंचालन डॉ. एम. बी. बिराजदार यांनी केले.

## 'एनएसएस' शिबिराचा अणदूरमध्ये प्रारंभ

[illegible]

समय सारथी

www.samaysarathi.com

## जवाहरच्या राष्ट्रीय सेवा योजना शिबिराचा अणदूरमध्ये शुभारंभ





पुढारी

# 'जवाहर'च्या राष्ट्रीय सेवा योजना शिबिरास सुरुवात

**अणदूर,पुढारी वृत्तसेवा :** तुळजापूर तालुक्यातील अणदूर येथील वत्सलानगर येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद व जवाहर कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय अणदूर राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांच्या वतीने "स्वच्छ ग्राम व आरोग्य संवर्धनासाठी युवा' वार्षिक विशेष शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

या शिबिराचे उद्घाटन राष्ट्रपिता महात्मा गांधी व शिक्षणमहर्षी सि.ना आलुरे गुरुजी यांच्या प्रतिमेचे पूजन करून झाले. परिषद सदस्य बाबुराव चव्हाण यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सरपंच रामचंद्र आलुरे होते. उपसरपंच डॉ नागनाथ कुंभार, ग्रामपंचायत सदस्य डॉ जितेंद्र कानडे, बाळकृष्ण घोडके-पाटील, डॉ विवेक बिराजदार, बालाजी घुगे, विविध कार्यकारी सोसायटीचे चेअरमन सिद्रमाप्पा शेटे, ज्येष्ठ नागरिक दिनकर कुलकर्णी, बापूराव कांबळे, जिल्हा परिषद शाळेचे मुख्याध्यापक अशोक जाधव, प्राचार्य डॉ उमाकांत चनशेट्टी यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ मल्लिनाथ बिराजदार यांनी केले.

सात दिवस चालणाऱ्या या शिबिरामध्ये विविध उपक्रम राबविण्यात येणार आहेत. वत्सलानगर येथे आयोजित करण्यात आलेल्या शिबिरात नागरिकांनी सहभागी होण्याचे आवाहन प्राचार्य डॉ. उमाकांत चनशेट्टी, कार्यक्रम अधिकारी प्रा.सूर्यकांत आगलावे,डॉ अनिता मुदकला,विद्यार्थी प्रतिनिधी नामदेव काळे व युवराज चव्हाण यांनी केले आहे.

My Latur Edition
Mar 22, 2022 Page No. 2
newspaper.pudhari.co.in



**दुसरा दिवस :** रविवार दि. 20/03/2022 रोजी सकाळी उठल्या नंतर प्राणायाम व योगासने घेण्यात आली. अल्पोपहारानंतर श्रमदान करताना परिसर स्वच्छता करण्यात आली. शाळे मागच्या रस्त्याच्या दोन्ही बाजूने पडलेली घाण व प्लॅस्टिक पिशव्या उचलून एकत्र केल्या व जाळून टाकल्या.



श्रमदान नंतर दुपारी एक वाजता सर्वांनी भोजनाचा आस्वाद घेतला.








दुपारच्या सत्रात 3 ते 5 या वेळेमध्ये प्रा. डॉ. मल्लिनाथ बिराजदार यांनी "राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवकांची कर्तव्ये व जबाबदारी" या विषयावर मार्गदर्शन केले. अध्यक्षस्थानी कार्यक्रमाधिकारी प्रा. डॉ. सूर्यकांत आगलावे हे होते. सायंकाळी 6 ते 8 या वेळेत "अंधश्रद्धा एक समाजाला लागलेली कीड" या विषयावर सप्रयोग व्याख्यानासाठी श्री दयानंद काळुंके (पत्रकार, दैनिक लोकमत) यांच्यासह मा. श्री चंद्रकांत उळेकर (आरळी) व मा. श्री सूर्यकांत वडजे (सोलापूर)

यांनी बुवा बाबा किंवा भोंदू बाबा आपल्या



समाजाला अंधश्रद्धेच्या नावाखाली कसे



लोकमत

# युवकांनी वैज्ञानिक दृष्टीकोन बाळगून मार्गक्रमण करावे

## अंनिसचे सूर्यकांत वडजे यांचे आवाहन

लोकमत न्यूज नेटवर्क

**अणदूर :** भूत, भानामती, मंत्र, तंत्र, करणी, जादूटोणा, बुवा-बाबांचे चमत्कार, फलज्योतिष आणि धार्मिक कर्मकांडाच्या अघोरी जोखडात न अडकता युवकांनी वैज्ञानिक दृष्टीकोन बाळगून आपल्या जीवनात यशस्वी मार्गक्रमण करावे, असे आवाहन सोलापूर अंनिसचे कार्यकर्ते सूर्यकांत वडजे यांनी केले.

येथील जवाहर महाविद्यालयाच्या राष्ट्रीय योजना शिबिरात 'अंधश्रद्धा ही समाजाला लागलेली कीड' या विषयावर 'अंधश्रद्धेची दुनिया चमत्काराची किमया' या कार्यक्रमात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी जवाहर महाविद्यालयाच्या माजी प्राचार्य डॉ. अनिता मुदकन्ना तर प्रमुख पाहुणे म्हणून उस्मानाबाद अंनिसचे कार्यकर्ते चंद्रकांत उळेकर, रासेयोचे कार्यक्रम अधिकारी डॉ. सूर्यकांत आगलावे उपस्थित होते.

वडजे म्हणाले, समाजातील अज्ञानाचा फायदा घेऊन विघातक वृत्तींकडून, बुवा-बाबांकडून होणारे शोषण थांबविण्यासाठी संशोधनात्मक व चिकित्सा करून विज्ञानाचा आधार घेऊन अंधश्रद्धेचे उच्चाटन करावे.

यावेळी वडजे यांनी विज्ञानाचे विविध प्रयोग सादर करून युवकांमध्ये जनजागृती केली. याच कार्यक्रमात चंद्रकांत उळेकर यांनी 'आजचा युवक आणि व्यसनाधिनता' याविषयी पोस्टर प्रदर्शन व गीतांच्या माध्यमातून प्रबोधन केले. डॉ. एम. बी. बिराजदार यांनी सूत्रसंचालन केले तर डॉ. रजपूत यांनी आभार मानले.

फसवतात व लुबाडतात हे प्रयोग करून दाखवले व मार्गदर्शन केले.



युवकांनी वैज्ञानिक दृष्टीकोन बाळगून यशस्वी मार्गक्रमण करावे : सुर्यकांत वडजे



**तिसरा दिवस :** सोमवार दि. 21/03/2022 रोजी सकाळी उठून विद्यार्थ्यांनी प्राणायाम व योगासने केली व कार्यक्रम अधिकारी यांनी दिनचर्या कशी असावी म्हणजे निरोगी राहण्यास मदत होते, असे मार्गदर्शन केले.



प्रत्येक विद्यार्थ्याने एक सुविचार सांगून स्वतःचा परिचय करून दिला, ज्यामुळे विद्यार्थ्यांना समोर उभा राहून बोलण्याचे धाडस निर्माण झाले. अल्पोपहारानंतर सकाळी 9 ते 12 यावेळेत श्रमदानातून शाळेसमोर वृक्षारोपणासाठी खड्डे खोदून घेतले व स्वच्छता केली.



दुपारच्या सत्रात 12 ते 2 या वेळेत आरोग्य तपासणी करताना डॉ. नागनाथ कुंभार व डॉ. विवेक बिराजदार यांनी स्वयंसेवकाची व काही ग्रामस्थांची आरोग्य तपासणी केली.









आरोग्यासंदर्भात विद्यार्थ्यांच्या काही शंका असतील त्याला उत्तरे देण्याचा कार्यक्रम झाला व दोन्ही डॉक्टरांचे सविस्तर असे मार्गदर्शन झाले. डॉ. नागनाथ कुंभार यांनी आरोग्याबद्दल सांगून व्यसनमुक्तीवर ही प्रकाश टाकला. अध्यक्षस्थानी कार्यक्रमाधिकारी प्रा. डॉ. अनिता मुदकण्णा या होत्या. सायंकाळच्या सत्रामध्ये 6 ते 8 या वेळेत शेतकरी मेळावा घेण्यात आला "कृषी विषयक शासकीय योजना" या विषयावर मार्गदर्शन करण्यासाठी प्रभारी कृषी मंडळ अधिकारी श्री प्रविण सरडे हे आले होते. अध्यक्षस्थानी नळदुर्ग चे कृषीपर्यवेक्षक श्री धन्यकुमार बिराजदार हे होते. दोघांनी उपस्थितांना शेतकऱ्यांसाठी शासन राबवत



असलेल्या सर्व योजनांची माहिती सविस्तरपणे सांगितली. चहापानानंतर कार्यक्रमाची सांगता झाली.

**चौथा दिवस :** मंगळवार दि. 22/03/2022 रोजी सकाळी स्वयंसेवकांची प्राणायाम, योगासने घेण्यात आली. तसेच विद्यार्थ्यांना आरोग्याबद्दल माहिती कार्यक्रमाधिकारी यांनी दिली.



अल्पोपहारानंतर श्रमदानामध्ये शाळेच्या समोरील रस्ता व परिसर स्वच्छ करून घेतला. त्यामध्ये शाळेचे विद्यार्थीही सहभागी झाले होते. सर्व कचरा उचलून ग्रामपंचायतच्या घंटागाडी मध्ये भरून गावाबाहेर टाकण्यात



आला व काही जाळून त्याची विल्हेवाट लावण्यात आली. विद्यार्थ्यांना स्वच्छतेचे





महत्व सांगितले.

दुपारच्या सत्रामध्ये 3 ते 5 या वेळेत "महाविद्यालयीन विद्यार्थ्यांची भूमिका व जबाबदारी" या विषयावर प्रा. डॉ. विश्वास माने



यांनी तर "संत, समाज व सेवा" या विषयावर मा. श्री महादेवप्पा नरे गुरुजी यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. दोन्ही विषयावर



सविस्तर अशा मार्गदर्शनानंतर प्रा. डॉ. संजय कुलकर्णी यांनी अध्यक्षीय समारोप केला. या कार्यक्रमाला प्राचार्य डॉ. उमाकांत चनशेट्टी, प्रा. डॉ. सुनील रजपूत, प्रा. डॉ. अंकुश कदम, प्रा. विवेकानंद वाहुळे, प्रा. धनंजय गटलेवार, प्रा. जी. टी. राठोड, प्रा. सुधाकर सांगळे, प्रा. दयानंद

कांबळे, प्रा. फुलचंद दूधभाते, कार्यक्रमाधिकारी प्रा. सूर्यकांत आगलावे व प्रा. अनिता मुदकण्णा या उपस्थित होत्या. कार्यक्रमाच्या शेवटी



विद्यार्थ्यांना संस्कार गीते या पुस्तकाचे वाटप करण्यात आले व रंगपंचमी असल्यामुळे सर्व विद्यार्थ्यांनी कोरडा रंग एकमेकांना लावला व साधेपणाने रंगपंचमी साजरी करण्यात आली.



विद्यार्थ्यांनी व सर्व प्राध्यापकांनीही एकमेकांना



रंग लावला. नंतर विविध गुणदर्शनाची तयारी करण्यात आली.

**पाचवा दिवस :** बुधवार दि. 23/03/2022 रोजी सकाळी सर्व विद्यार्थ्यांनी शाळेतील कांही विद्यार्थ्यांसह प्राणायाम, योगासने व ध्यान





केले. अल्पोपहारानंतर श्रमदानातून वत्सलानगर येथील सर्व रस्ते साफ केले व गटारीचे पाणी जिथे तुंबलेले होते तेथे गटार उपसून पाणी वाहते केले.



काही ग्रामस्थांनीही विद्यार्थ्यांना मदत केली व विद्यार्थ्यांचे कौतुकही केले. दुपारच्या सत्रात 3



ते 4 या वेळेत विद्यार्थी व प्राध्यापक यांनी बालविवाह प्रतिबंधक रॅलीमध्ये मोठ्या आवाजात घोषणा दिल्या व बालविवाह रोखण्यासाठी जनजागृती केली. तसेच महिलांना महिला मेळाव्यासाठी निमंत्रण दिले.





रॅली नंतर लगेच 4 ते 6 दरम्यान अणदूर गावातील कांही महिला, वत्सलानगर मधील कांही महिला, विद्यार्थी व प्राध्यापिका यांचा महिला मेळावा झाला. "महिला सक्षमीकरण" हा विषय घेऊन महिला मेळाव्यात मार्गदर्शन करण्यात आले. प्रमुख पाहुण्या म्हणून विशाखा समितीच्या उस्मानाबाद जिल्हा अध्यक्षा श्रीमती सुजाता चव्हाण या होत्या,






तर अध्यक्ष म्हणून प्रगती महिला मंडळाच्या अध्यक्षा सौ. संजीवनी आलुरे या होत्या. कार्यक्रमासाठी सौ. मीरा घुगे, सौ. कोमल बीच्चे, कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. अनिता मुदकण्णा, प्रा. डॉ. मीना जाधव, प्रा. माधुरी गडसिंग, सौ. मोकाशे व इतर महिला उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कुमारी आकांक्षा मोकाशे हिने केले, तर आभार कुमारी प्रणाली गायकवाड हिने मानले.

**सहावा दिवस :** गुरुवार दि. 24/03/2022 रोजी सकाळी उठून विद्यार्थ्यांनी प्राणायम, योगा व ध्यान केले. प्रा. डॉ. मल्लिनाथ बिराजदार यांनी विद्यार्थ्यांना प्राणायाम व योगासनाचे धडे दिले.





अल्पोपहारानंतर श्रमदानात विद्यार्थ्यांनी



वत्सलानगरचा उत्तरेकडील व पश्चिमेकडील रस्ता साफ केला. तसेच गटारी मोकळ्या करून



सांड पाण्याचे व्यवस्थापन केले.






दुपारच्या सत्रामध्ये 3 ते 5 या वेळेत "कोरोना नंतरची सामाजिक परिस्थिती" या विषयावर संगमेश्वर महाविद्यालय, सोलापूर चे प्रा. डॉ. मंगलमुर्ती धोकटे सरांचे व्याख्यान झाले.






अध्यक्षस्थानी प्रा. वीरभद्र स्वामी हे होते. सायंकाळी 6 ते 8 या वेळेत विद्यार्थ्यांनी विविध गुणदर्शनाचा कार्यक्रम केला. कांही गीताच्या माध्यमा



तून मनोरंजनाबरोबरच प्रबोधन करण्यात आले. छोटी नाटिका सादर करताना शेतकऱ्यांनी




सरकारी योजनाचा लाभ घेत व कष्ट करत संसाराचे नियोजन कसे करावे व आत्महत्या



करू नये असा संदेश दिला. विविध गुणदर्शनाचा कार्यक्रमात वत्सलानगरच्या जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांनीही सहभाग घेतला.



**सातवा दिवस** : शुक्रवार दि. 25/03/2022 रोजी सकाळी उठून विद्यार्थ्यांनी प्राणायाम व योगासने केली. अल्पोपहारानंतर श्रमदान



करताना विद्यार्थ्यांनी वत्सलानगरचा उत्तरेकडील भागात गटार स्वच्छता केली. मंदिर आणि रस्ते झाडून कचरा गोळा करून जाळला.







नंतर दुपारी 2 वाजता समारोपाचा कार्यक्रम घेण्यात आला. समारोपाला प्रमुख पाहुणे म्हणून अणदूरच्या विविध कार्यकारी सेवा सोसायटीचे चेअरमन श्री सिद्रामप्पा शिवप्पा शेटे हे होते. तर अध्यक्ष म्हणून प्राचार्य डॉ. उमाकांत चनशेट्टी हे होते.




कार्यक्रमाच्या सुरुवातीला कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. सूर्यकांत आगलावे यांनी शिबिराचे अहवाल वाचन केले.



नंतर शिबिरार्थी विद्यार्थी सोमनाथ पोतदार, कुमारी प्रणाली गायकवाड, कुमारी रुचा मुळे, निखिल कांबळे, प्रदीप राठोड यांनी मनोगते व्यक्त केली. नंतर पाहुणे व अध्यक्ष यांचे मार्गदर्शन झाले. त्यानंतर प्रा. दयानंद कांबळे यांनी आभार मानले व सूत्रसंचालन प्रा. डॉ. मल्लिनाथ बिराजदार यांनी केले.



जवाहरच्या राष्ट्रीय सेवा योजना शिबिराची सांगता



समय सारथी

जवाहरच्या राष्ट्रीय सेवा योजना शिबिराची सांगता

वत्सलानगर भागात स्वच्छतेसह शेतकरी व महिला मेळावे संपन्न





पुण्य नगरी

# अणदुर येथे स्वच्छग्राम शिबिराचा समारोप



दिव्य मराठी विशेष • अणदूर येथील जवाहर महाविद्यालयाचे रासेयो शिबिर उत्साहात

# स्वयंसेवकांनी केली ग्रामस्वच्छता, कृषी, महिला सक्षमीकरणाबाबत जनजागृती

शिबीर यशस्वीतेसाठी कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. सूर्यकांत आगलावे, प्रा. डॉ. अनिता मुदकण्णा, प्रा. डॉ. मल्लिनाथ बिराजदार, प्रा. डॉ. राजशेखर वरशेट्टी, प्रा. डॉ. सुनील रजपूत, प्रा. नागनाथ कबाडे, प्रा. डॉ. मानसी स्वामी यांनी परिश्रम घेतले. गावातील सरपंच व सर्व सदस्य तसेच वत्सलानगरचे ग्रामस्थ यांनी शिबिरात सहभाग घेतला व सहकार्य केले.

